# कविता म्हणजे कला आणि शास्त्र

मध्यंतरी एका व्यक्तीचे वक्तव्य ऐकले: "कविता म्हणजे ट ला ट जोडत... आडव्या लिखाणाऐवजी उभे लिहिण्याचा रिकामपणचा उद्योग". त्या व्यक्तीच्या 'उचलली जीभ लावली टाळूला' या वृत्तीवर हसावे की रडावे हेच कळेना. अर्थात जगात सर्वांना आपण समजावून सांगणे अशक्य आहे. पण ज्यांना इच्छा होती त्यांना सांगितले; आणि त्यांना ते समजले, हेही नसे थोडके! ते माझे लेखन येथे "शेअर" करत आहे.... कारण "शब्दें वांटूं धन जनलोकां"... असं संत तुकाराम म्हणून गेले.

संख्याशास्त्र आणि संगणकशास्त्र हे माझे प्राध्यापकी अध्यापन आणि संशोधनाचे विषय असले तरी त्याच बरोबर मी कविता वाचते, ऐकते. आजवर १००+ स्वलिखित कविता प्रकाशित झाल्या आहेत; एकंदर काव्यछंद जोपासते आहे, कारण मला कवितेतील कला आणि शास्त्र दोन्ही आवडते. सगळ्या कविता चिऊकाऊच्या... काल्पनिक नसतात, जगण्यातील आणि आसपासच्या अनुभवांचे पडसादही त्यात असतात.

मुक्तछंदात शब्दांना, अर्थांना आणि रचनेला जेव्हढे महत्त्व, तेव्हढेच पण त्याबरोबर रचनेच्या काही नियमांचे शास्त्र छंदकाव्यात आहे. त्यात ह्रस्व, दीर्घ शब्दांप्रमाणे मात्रागण, अक्षरगण, छंद जाती, लय विराम /यती, यमक यांचे "गणित" रचनेत सांभाळावे लागते. पूर्वापार संस्कृतपंडितांना आणि 'विदेशी' कवींनाही ते ठाऊक होते ( नमुन्यादाखल - शेक्सपीअरचे सॉनेट, गालीबच्या उर्दू पार्शी गझल यांना वृत्त/मीटर आहे.) कालिदासाचे मेघदूत हे खंडकाव्य मंदाक्रांत या जलदगतीच्या वृत्तात, रामदासांचे मनाचे श्लोक भुजंगप्रयात **वृत्तात**, रामरक्षा अनुष्टुप् छन्दात, या कुन्दे... तसेच रामोराजमणि:सदा विजयते... हे शार्दूलविक्रीडित वृत्तात आहे. बहिणाबाईंच्या काही कविता वृत्तात आहेत. **श्रावण मासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे ...यात पादाकुलक वृत्त** आणि अगदी अलिकडचे गुरू ठाकूर (उदाहरणार्थ कविता- ---
असे जगावे छाताडावर आव्हानाचे लावुन अत्तर
नजर रोखुनी नजरेमध्ये आयुष्याला द्यावे उत्तर... (रचना८-८-८-८ मात्रावृत्त आहे)
संदीप खरे यांच्याही काही मुक्तछंद आणि काही वृत्तात कविता आहेत. अशी अनेक उदाहरणे देता येतील. आकाशाशी, जडले नाते, धरणी मातेचे...या काव्यात ८-८-१० मात्रांची वृत्तात रचना **ग.दि. माडगूळकरांनी** साधली आहे. आणि अलिकडे मी काढलेल्या छायाचित्रावर मी लिहिलेल्या ४ पंक्तीही याच वृत्तात ८-८-१० मात्रांमध्ये प्रत्येक ओळीत लिहिल्या आहेत. (उदा. माझी पहिली ओळ: नील मोहिनी, जळांस पडली, धरा त्यांस साक्षी... ८-८-१० मात्रा).

थोडक्यात, काव्य हेदेखील "शास्त्र" आहे. **भारतातील** माधव ज्यूलियन, भाऊ पाटणकर, रमेशचंद्र पाध्ये, सुरेश भट यांच्या मराठी **गझल (आणि मूळ उर्दू पार्शी गझल) यांसही मीटर/वृत्त आणि नियम आहेत.** अगदी जपानी हायकू ही ७, ११, ७ स्वरांची ३ ओळींची रचना असते. यावरून मराठी संस्कृतच नव्हे, जागतिक पातळीवरही...काव्यशास्त्राचा आवाका किती मोठा आहे हे समजते. कविता दुसऱ्याला कळावी हे महत्त्वाचे, तसेच त्याची रचना शास्त्रीय पध्दतीने करणे आव्हान असते. **"कविता नेणीवेचा शोध घेते" असे जागतिक पातळीवरील मनोविश्लेषक सिग्मण्ड फ्रॉईड म्हणून गेला.** काही कविता सुप्त मन:स्थितीत अचानक सुचतात, काही घडवाव्या लागतात. तेव्हा यापुढे कुणी कविता म्हणजे केवळ रिकामटेकड्यांचे काम..., इकडचे तिकडचे वाचलेले शब्द गोळाकरून आडव्या ऐवजी उभे लिहून कविता लिहू लागले, तर त्यांना काव्यशास्त्राबद्दल जरा सज्ञानी करायला हवे. आयुष्यभर पुरून उरेल इतके विपुल काव्यशास्त्र आहे, अर्थात ज्यांना ते समजून घेण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी ते आहे.

- **विनता कुलकर्णी** (जानेवारी १, २०२१)

***